# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

web-www.dhepune.gov.in, E-Mail : mavi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं. ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं-२०२२/वै.दे/परिगणना/कोविड-१९/मुं.वि/मवि-२/ १३५८९ दिनांक /११/२०२२

15 NOV 2022

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

**विषय- कोविड-१९ आजारावरील वैद्यकीय खर्च प्रतिपुर्तीची देयकांची देयकाची शासन निर्णय दिनांक २२ जुन, २०२२ मधील अधिसुचनेनुसार परिगणना करेणबाबत.**

संदर्भ-१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक एमजी २००५/९/प्र.क्र.१/ आरोग्य ३/ दिनांक १९.०३.२००५.

२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३२५/मशि-५ /दिनांक ०२ऑगस्ट, २०१९

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:वैखप्र-२०२०/प्र.क्र.६६ / राकावि-२/दिनांक १७ डिसेंबर, २०२०.

४) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:वैखप्र-२०२१/प्र.क्र.१८८/ राकावि-२/दिनांक २२ जुन, २०२२.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, संदर्भिय क्रमांक ०१ च्या शासन निर्णयान्वये शासकीय अधिकारी/कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना आकस्मिक प्रसंगी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचाराच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती मिळणेकरीता २७ आकस्मिक व ५ गंभीर आजारांची यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर यादीत संदर्भाधीन क्र.३ च्या दिनांक १७ डिसेंबर, २०२० च्या शासन निर्णयान्वये कोविड-१९ या नवीन आजाराचा आकस्मिक आजारांमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. तसेच संदर्भिय शासन निर्णय क्र.२ नुसार उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अनुदानित महाविद्यालयातील अनुज्ञेय शिक्षकीय/शिक्षकेत्तर कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजूरीच्या अधिकारांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. तसेच संदर्भिय शासन निर्णय क्रमांक.४ नुसार कोविड-१९ या आजारावरील प्रतिपुर्ती देयकांची परिगणना करणेबाबत शासन निर्णयातील संदर्भिय अधिसुचना क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.९७/आ-५/दिनांक. २१/०५/२०२० अन्वये कोविड-१९ या आजारावरील उपचार खर्चाची दरनिश्चिती करण्यात आलेली

आहे. सदर अधिसुचनेमध्ये दिनांक ३०.०८.२०२०, दिनांक ३०.११.२०२० व दि.०१.०६.२०२१ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. त्यामुळे खाजगी व शासनमान्य खाजगी रुग्णालयातील उपचाराच्या वैद्यकीय खर्च प्रतिपुर्तीच्या प्रकरणात, संबंधित रुग्णाच्या रुग्णालयातील आंतररुग्ण कालावधी ज्या शासन अधिसूचनेच्या कालावधीशी संबंधित आहे त्या शासन अधिसुचनेनुसार कोविड-१९ या आजाराविषयक वैद्यकीय खर्च प्रतिपुर्तीच्या देयकाची परिगणना करुन व उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक ०२ऑगस्ट, २०१९ च्या नुसार संचालनालयास सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१.

प्रत माहितीस्तव सविनय सादरः-

मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२